# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

**दिनांक १०.०६.२०२६ बुधवार**

**(कामगिरी)**

**१) गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभाग पथकाची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपींना अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक १०.०६.२०२६ चे १०.१५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा सामाजिक सुरक्षा विभग पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी, मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृध्दी महामार्ग, टोल नाका, नागपूर येथे सापळा रचून, मुंबई येथून नागपूरकडे येणाऱ्या ट्रॅव्हल्स् बसला थांबवून त्यातील दोन संशयीत इसमांना ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांची नांवे १) शकील अहमद अब्दुल खालीद वय ३५ वर्षे रा. तकीया दिवानशाह, मोमीनपुरा नागपूर २) सय्यद शहबाज कुरेशी वय २० वर्ष रा. कसाबपुरा, मस्जिद जवळ, नागपूर असे सांगीतले. त्यांचेजवळ अंमली पदार्थ असल्याचे दाट संशयावरुन त्यांची एन.डी.पी.एस. कायद्याचे तंतोतंत पालन करुन अंगझडती घेतली असता, त्यांचे ताब्यातुन एकुण ११३ ग्रॅम १९० मिलीग्राम एम.डी. पावडर किंमती अंदाजे ११,३१,९००/— रू. ची मिळुन आली. आरोपीचे ताब्यातुन एम.डी. पावडर, रोख ४,५००/—रू., ०२ मोबाईल फोन असा एकुण ११,५७,४००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींची सखोल विचारपूस केली असता, त्यांनी मुंबई, कुर्ला येथील त्यांचा साथिदार पाहिजे आरोपी डिश नावाचे मुलाकडून आणल्याचे सांगीतले. आरोपी हे स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्री करण्याकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(क),२९ एन.डी.पी.एस. अॅक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपींना अटक करण्यात आली आहे. आरोपींना मुद्देमालासह पुढील कारवाईस्तव हिंगणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. दर्शन पाटील, सपोनि शिवाजी ननवरे, पोहवा समाधान गिते, नापोअं शेषराव राऊत, पोअं. कुणाल मसराम, समीर शेख, अश्विन मांगे, किशोर ठाकरे व कुणाल बोडखे यांनी केली.



**२) गुन्हेशाखा, युनिट ०१ पोलीसांची कामगिरी :— अवैध मोहफुलाचे हातभट्टीवर धाड, दारूसाठा जप्त.**

दिनांक १०.०६.२०२६ चे ०५.४५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट ०१ चे अधिकारी व अंमलदार हे गुन्हेगारांचे शोधात पेट्रोलींग करीत असता, त्यांनी मिळालेल्या खात्रीशीर माहीतीवरून, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत, चंद्रपूर रेठी गाव, ग्रामपंचायत पेठ, हिंगणा, नागपूर येथे राहणारा ईसम नामे दीपक रामभाऊ पवार वय ४० वर्षे याचे राहते घरी पंचासमक्ष रेड कार्यवाही केली असता, आरोपी हा त्याचा साथरदार आरोपी क्र. २) ज्ञानेश्वर श्रीराम मारवाडी वय ४५ वर्ष रा. चंद्रपूर रेठी, हिंगणा, नागपूर याचेसह संगनमताने मोहफुलाची गावठी दारु तयार करण्याची हातभ्ट्टी चालवितांना मिळून आला. आरोपीचे ताब्यातून १२० लीटर मोहफुलची गावठी दारू व दारु तयार करण्याचे साहित्य, ड्रम तसेच अंदाजे २२०० लीटर मोहफुलाचा सडवा मिळून आला. आरोपींचे ताब्यातुन एकुण १,४७,१००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. मोहफुलाचा सडवा नष्ट करुन इतर साहित्याची विल्हेवाट लावण्यात आली. आरोपींविरूध्द पोलीस ठाणे हिंगणा येथे कलम ६५(ई)(फ) महा. दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदविला आहे. आरोपींना मुद्देमालासह हिंगणा पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल, पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. नविनचंद्र रेड्डी सह. पोलीस आयुक्त नागपूर शहर, मा. श्री. राजेंद्र परदेशी, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री दिपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली, पोनि. प्रशांत ठवरे व त्यांचे पथकातील अधिकारी व अंल

दार व आरसीपी पथक यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>पोलीस ठाणे कळमणा :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक १०.०६.२०२६ चे ०४.४० वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, भरतनगर कडे जाण्याऱ्या रोडवरील सर्जा टाईल्स समोर रोडलगत एका ग्रे रंगाची डियो गाडीवर दोन इसम संशयीतरित्या दिसल्याने, त्यांना थांबवून पंचासमक्ष त्यांचे नाव पत्ता विचारले असता, त्यांनी त्यांचे नावे १) सागर विजय रंभाडे वय २४ वर्षे रा. पाचपावली, पहिला फाटक, मनपा गोडावूनजवळ, नागपूर २) जतीन रणधीर गौर वय १८ वर्षे रा. गुलमोहरनगर, कळमणा, नागपूर असे सांगीतले. त्यांची व डियो मोपेड क्र. एमएच ३१ एफएन ०९६३ ची झडती घेतली असता, आरोपींचे ताब्यातुन गाडीचे डिक्कीत एक लोखंडी चाकु मिळून आल्याने चाकू व वाहन एकूण किंमती ६०,२००/— रू. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

आरोपी हे दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु बाळगून समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपींना अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(मिसिंग)**

**<u>पोलीस ठाणे अजनी</u> :—** खुशाल चिंधुजी भुजाडे वय ४६ वर्षे रा. प्लॉट क्र. २५, शामनगर, हुडकेश्वर, नागपूर हे दिनांक २३.०५.२०२६ चे २२.०० वा. पासुन पोलीस ठाणे अजनी हद्दीतून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत गेले नाहीत. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाहीत. **<u>वर्णन</u>** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ७ इंच, केस— काळे पांढरे, अंगात—शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.



खुशाल

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उपनिरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**